# मराठी विभाग : अहवाल

शैक्षणिक वर्ष २०२१ – २२ मध्ये पदवीच्या द्वितीय वर्षात मराठी विषयाचे विशेषस्तरावर अध्ययन करण्यासाठी सुमारे ४४ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. तृतीय वर्षातील मराठी विषयाच्या विद्यार्थ्यांची संख्या ४२ आहे. एम.ए. मराठीच्या प्रथम वर्षास १३तर द्वितीय वर्षास १३ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली ऑनलाईन / ऑफलाईन अध्यापन व इतर शैक्षणिक उपक्रमांचे नियोजन करण्यात आले. करोनाकाळामुळे प्रथम सत्राचे अध्यापन व उपक्रम झूमच्या माध्यमातूनऑनलाईन पद्धतीने घेण्यात आले. या शैक्षणिक वर्षातील मराठी विभागाच्या वतीने खालील उपक्रम राबविण्यात आले.

## राष्ट्रीय वाचन दिन :

दि. १९ जून २०२१ रोजी मराठी विभागाच्या वतीने राष्ट्रीय वाचन दिनाचे आयोजन करण्यात आले. या निमित्त आयोजित **'चला वाचू या'** उपक्रमाच्या ऑनलाईन उद्घाटनप्रसंगी प्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, उपप्राचार्य प्रा. एस. एन. टाकळकर, प्रबंधक कैलास पाचारणे आणि इतर अभिवाचक प्राध्यापक उपस्थित होते. या प्रसंगी बोलताना **प्राचार्य डॉ. व्ही.डी. कुलकर्णी** यांनी वाचन संस्काराने येणारी बहुश्रुतता जीवन समृद्ध करते. यासाठी सर्वांनीच पुस्तकांना आपल्या जगण्याचा भाग बनवून त्यांच्याशी मैत्री करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन केले. उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे यांनी केरळमधील पुस्तक आंदोलनाचे जनक पी.एन. पैनिकर यांच्या स्मरणार्थ राष्ट्रीय वाचन दिनाचे आयोजन करण्यात येत असल्याचे सांगून'चला वाचू या' या उपक्रमाची पार्श्वभूमी सांगितली. 'वाचण्यासाठी शिका आणि शिकण्यासाठी वाचा' या मंत्रानुसार सर्वांनीच वाचनसंस्कृती जोपासण्यासाठी प्रयत्नशील राहण्याचे आवाहन त्यांनी केले. वाचन दिनाचे औचित्य साधून महाविद्यालयातील प्राध्यापकांनी त्यांच्या आवडीच्या ग्रंथांचे अभिवाचन केले. विद्यार्थ्यांनीही ऑनलाईन पद्धतीने या उपक्रमात सहभाग घेतला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. बाळासाहेब अनुसे यांनी तर आभार ग्रंथपाल प्रा.पूनम तापकीर यांनी मानले

## वाचन प्रेरणा दिन :

मराठी विभागाच्या वतीने डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचा जन्मदिन (१५ ऑक्टोंबर) वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा करताना काव्यवाचन स्पर्धा, ऑनलाईन वेबिनार, पुस्तक भेट कार्यक्रम आदी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

## काव्यवाचन स्पर्धा :

दि. १३ ऑक्टोंबर २०२१ रोजी काव्यवाचन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. यामध्ये **प्रथम क्रमांक कु. मयुरी साकोरे, द्वितीय क्रमांक कु. संस्कृती राळे व तृतीय क्रमांक कु आलिशा रौंधळ** यांचा आला. पुस्तक, प्रशस्तिपत्रक देऊन त्यांचे कौतुक करण्यात आले परीक्षक म्हणून प्रा.डी.एम.मारकड व प्रा. सोमनाथ ठोंगिरे यांनी काम पाहिले.

## 'महाविद्यालयीन तरुणाई व वाचनसंस्कृती' या विषयावर ऑनलाईन वेबिनार :

दि. १४ ऑक्टोंबर २०२१ रोजी कोपरगाव महाविद्यालयातील **डॉ. कैलास महाले** यांचे 'महाविद्यालयीन तरुणाई व वाचनसंस्कृती' या विषयावर ऑनलाईन वेबिनार संपन्न झाले.

**पुस्तक भेट कार्यक्रम :**

दि. १५ ऑक्टोंबर २०२१ रोजी पुस्तक भेट कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष **ॲड. देवेंद्रजी बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर**, प्राचार्य डॉ.व्ही.डी. कुलकर्णी, प्राचार्य डॉ. एच.एम.जरे, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रा. दिलीप मुळूक, प्रा. किशोर लांडेपाटील, डॉ. बाळासाहेब अनुसे, प्रा.मच्छिंद्र मुळूक, प्रा. डी. एम. मारकड, प्रा.योगेश वाळुंज, प्रा. साईनाथ पाचारणे उपस्थित होते. या वेळी बोलताना संस्था अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील म्हणाले की, वाचनातून आनंद व त्यातून येणारी सर्वांगीण समृद्धता माणसाला जगण्यास पात्र बनवत असून विद्यार्थ्यांनी समृद्ध जीवनासाठी वाचनसंस्कृतीजोपासण्याचे आवाहन केले. विद्यार्थी हा कोणत्याही शाखेचा असला तरी त्याला चौफेर वाचन हे श्वासोच्छासाइतकेच आवश्यक आहे. वाचनातून ज्ञानतृष्णा व ज्ञानसंग्रह करण्याची वृत्ती विद्यार्थ्यांनी जोपासावी. मराठी विभाग विद्यार्थ्यांची वाचनाची आवड जोपासण्यासाठी करीत असलेल्या प्रयत्नांबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला. करोनाच्या पार्श्वभूमीवर महाविद्यालय सुरू होणार असल्याने वरिष्ठ विभागातील विद्यार्थ्यांनी लसीकरण करून घ्यावे, असे आवाहन त्यांनी केले. संस्था उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर यांनी वाचनामुळे माणसाची विचार करण्याची क्षमता वाढून जाणिवा सशक्त होत असल्याने विद्यार्थ्यांनी पुस्तकांच्या सहवासात रमण्याचे आवाहन केले प्राचार्य डॉ. व्ही.डी. कुलकर्णी यांनी सजक अभिरुची वृद्धीसाठी वाचन आवश्यक असल्याचे म्हटले

वाचन प्रेरणा दिनाच्या निमित्ताने मराठी विभागाच्या वतीने व्याख्यान, काव्यवाचन स्पर्धा तसेच विविध ऑनलाईन उपक्रमात सहभाग घेतलेल्या सुमारे १२५ विद्यार्थ्यांना ग्रंथ भेट देण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संजय शिंदे यांनी, सूत्रसंचालन डॉ बाळासाहेब अनुसे यांनी तर आभार प्रा. साईनाथ पाचारणे यांनी मानले.

**दिवाळी अंक भेट उपक्रम :**

दि. ३० ऑक्टोंबर २०२१ रोजी मराठी विभागाच्या वतीने दिवाळी अंक भेट कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष **ॲड. देवेंद्रजी बुट्टे पाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर,** संचालक शांताराम घुमटकर, डॉ. रोहिणी राक्षे, हिरामण सातकर पाटील, प्राचार्य डॉ. व्ही.डी.कुलकर्णी, प्राचार्य डॉ. एच.एम.जरे, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रा.एस.एन.टाकळकर, प्रबंधक कैलास पाचारणे, डॉ.राजेंद्र शिरसी, डॉ. दिलीप मुळूक, डॉ. बाळासाहेब अनुसे, प्रा. योगेश वाळुंज उपस्थित होते.

संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्रजी बुट्टे पाटील या वेळी बोलताना म्हणाले की, महाराष्ट्राची वैभवशाली परंपरा असलेले दिवाळी अंक म्हणजे सकस, दर्जेदार, आणि नाविन्यपूर्ण लेखनाची मेजवानी असणारा साहित्योत्सव असून या वाचन परंपरेचे जतन करण्याचे काम विद्यार्थ्यांनी करावे. समाजमाध्यमांच्या वाढत्या आक्रमणातही वाचनसंस्कृती टिकवून ठेवण्याचे आणि वाचकांच्या जाणिवा समृद्ध करण्याचे काम दिवाळी अंकांनी केले आहे.दिवाळी अंक आपले सांस्कृतिक वैभव असून या शतकोत्तर ऐतिहासिक साहित्य परंपरेच विद्यार्थ्यांनी पुढे सक्षमपणे न्यायला हवा मराठी विभाग दरवर्षी दिवाळी अंक वाचनाची आवड असणाऱ्या विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचत असल्याबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला. दिवाळी चैतन्याचा दीपोत्सव असून विद्यार्थ्यांनी योग्य ती काळजी घेऊन करोनारुपी अंधकारावर मात करण्याचे आवाहन त्यांनी केले.

मराठी विभागाच्या वतीने आयोजित विविध ऑनलाईन उपक्रमात सहभागी झालेल्या निवडणूक शंभर विद्यार्थ्यांना **साधना साप्ताहिकाचा युवा व बालकुमार दिवाळी अंक**भेट देण्यात आला. प्रास्ताविक डॉ संजय शिंदे यांनी तरआभार डॉ. बाळासाहेब अनुशे यांनी मानले.

**साहेबरावजी बुट्टेपाटील यांच्या स्मृतिदिनानिमित्त निबंधस्पर्धा** :

दि. १ डिसेंबर ते ३० डिसेंबर २०२१ दरम्यान साहेबरावजी बुट्टेपाटील यांच्या स्मृतिदिनाचे औचित्य साधून निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. यामध्ये **प्रथम क्रमांक वैष्णवी अरुण पानमंद द्वितीय क्रमांक मृणाल संतोष घनवट व तृतीय क्रमांक वैष्णवी सतीश भुजबळ**यांचा आला. दि. ३ जानेवारी २०२२ रोजी पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्यांना खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अॅड देवेंद्रजी बुट्टे पाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, मानद सचिव हरिभाऊ सांडभोर, संचालक हिरामण सातकरपाटील, प्राचार्य डॉ. व्ही.डी.कुलकर्णी यांच्या हस्ते प्रमाणपत्र व ग्रंथ भेट देऊन त्यांचे कौतुक करण्यात आले

**मराठी भाषा संवर्धन पंधरवडा उपक्रम:**

दि. ७ जानेवारी २०२२ रोजी मराठी भाषा संवर्धन पंधरवडानिमित्तव्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी कर्जत जि. अहमदनगर येथील दादा पाटील महाविद्यालयाचे **प्राचार्य डॉ. संजय नगरकर**, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मराठी अभ्यास मंडळाचे सदस्य डॉ संदीप सांगळे प्राचार्य डॉ. व्ही.डी. कुलकर्णी, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, डॉ. बाळासाहेब अनुसे, प्रा. मच्छिंद्र मुळूक, प्रा. प्रतिक्षा खराडे, प्रबंधक कैलास पाचारणे उपस्थित होते. प्राचार्य डॉ. संजय नगरकर म्हणाले की, अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण आणि आरोग्य या प्राथमिक गरजांसोबत भाषा ही माणसाच्या जगण्याची मूलभूत गरज आहे. त्यांनी करोना काळात साहित्य, संगीत, कला यांचे सांस्कृतिक महत्त्व अधोरेखित केले. करोनामुळे मराठी माणसाच्या तोंडी अनेक नवीन संज्ञा सहज रूळल्या असून त्या शब्दांना पर्यायी नवे मराठी शब्द सुचवणे व ते वापरात आणणे आवश्यक असल्याचे सांगून मराठी भाषा पंधरवडा साजरा केल्याचे ते सार्थक ठरेल असे म्हणाले.

अभ्यास मंडळाचे सदस्य **डॉ. संदीप सांगळे** यांना सांगितले की मराठी विषयाच्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमात विद्यापीठाने कौशल्याधिष्ठित घटकांचा समावेश केला आहे. विद्यार्थ्यांनी विविध भाषिक व व्यावसायिक कौशल्ये आत्मसात करण्यासाठी आपल्या मातृभाषेचा आधार घेतल्यास मराठी भाषा आणि साहित्याला निश्चित वैभव प्राप्त होईल. माय मराठीला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त होण्यासाठी राज्यकर्त्यांनी इच्छाशक्ती दाखवावी, अशी अपेक्षा व्यक्त करून मराठी विभाग राबवित असलेल्या विविध नाविन्यपूर्ण उपक्रमांचे त्यांनी कौतुक केले कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत डॉ. संजय शिंदे यांनी केले आभार डॉ. बाळासाहेब अनुसे यांनी मानले.

**प्रा. प्रमोद पवार यांचे व्याख्यान :**

दि. ३ फेब्रुवारी २०२२ रोजी मराठी विभागाच्या वतीने पदव्युत्तर स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी नाशिकच्या यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातील मानवविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखेचे**शैक्षणिक समन्वयक प्रा. प्रमोद पवार** यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी प्राचार्य डॉ. व्ही.डी. कुलकर्णी, उपप्राचार्य

व मराठी विभाग प्रमुख डॉ. संजय शिंदे, प्रा. किशोर लांडेपाटील, डॉ. बाळासाहेब अनुसे, डॉ. विकास रासकर, प्रा. मच्छिंद्र मुळूक, प्रा. प्रतिक्षा खराडे व मराठी विभागाचे पदव्युत्तर स्तरावरील विद्यार्थी उपस्थित होते.

या वेळी बोलताना प्रा. प्रमोद पवार यांनी इंटरनेटवर उपलब्ध असलेल्या विविध सॉफ्टवेअरच्या माध्यमातून देवनागरी लिपीत अधिकाधिक लेखन आणि भाषांतर करता येणे शक्य असून त्यासाठी मराठी भाषा आणि तंत्रज्ञानात स्नेह निर्माण होण्याची गरज व्यक्त केली. प्रास्ताविकात डॉ. संजय शिंदे यांनी मराठी विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांमध्ये विविध भाषिक कौशल्यांची समज वाढावी यासाठी अनेक उपक्रम राबविण्यात येत असल्याचे सांगितले भाषा हीच सुसंवादासाठी आणि ज्ञानवृद्धीसाठी आवश्यक असून नोकरीव्यवसायाच्या दृष्टीने विद्यार्थ्यांनी भाषेवर प्रभुत्व मिळवावे असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ बाळासाहेब अनुसे यांनी तर आभार प्रा प्रतिक्षा खराडे यांनी मानले.

**पत्रलेखन स्पर्धा :**

दि. १५ ते २४ फेब्रुवारी २०२२ दरम्यान कवीवर्य कुसुमाग्रज यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून मराठी विभागाच्या वतीने पत्रलेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. यामध्ये प्रथम क्रमांक कांचन बाळासाहेब कोबल, द्वितीय क्रमांक गणेश आत्माराम मोरे व तृतीय क्रमांक सेजल शांताराम वरकड यांचा आला तर उत्तेजनार्थ मृणाल संतोष घनवट, वर्षा माधव भोईवाडे यांचा आला.

कुसुमाग्रज यांच्या जन्मदिनी (२७ फेब्रुवारी) पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्यांना खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड देवेंद्रजी बुट्टे पाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, मानद सचिव हरिभाऊ सांडभोर यांच्या हस्ते प्रमाणपत्र व ग्रंथ भेट देऊन त्यांचे कौतुक करण्यातयेणार आहे.

**शब्द'प्रतिभा' विशेषांक प्रकाशन :**

दि. २७ फेब्रुवारी २०२२ रोजी कवीवर्य **कुसुमाग्रज यांच्या जन्मदिनानिमित्त** मराठी भाषा गौरव दिन साजरा करण्यात येणार आहे. त्या निमित्ताने मराठी विभागाच्या वतीने विशेषांकाचे प्रकाशन करण्यात येणार आहे. कवयित्री शान्ता शेळके यांच्या जन्मशताब्दी निमित्ताने त्यांच्या कवितांचे आणि गीतांचे आस्वादक रसग्रहण करणारा **शब्द'प्रतिभा' या विशेषांकाचे प्रकाशन** खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड देवेंद्रजी बुट्टे पाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, मानद सचिव हरिभाऊदादा सांडभोर यांच्या हस्ते संपन्नहोणार आहे.

**विद्यापीठस्तरीय मुद्रितशोधन कार्यशाळा**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील विद्यार्थी विकास मंडळ आणि हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील मराठी विभाग यांच्या वतीने ११, १२ मे २०२२ रोजी विद्यापीठस्तरीय मुद्रितशोधन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेचा समारोप दि. २१ मे रोजी आयोजित करण्यात आला. या प्रसंगी बोलताना प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे यांनी विद्यार्थ्यांचा कौशल्याधिष्ठित विकास होण्यासाठी भाषेचे मूलभूत ज्ञान असणे आवश्यक असून त्यांना वाचन, लेखन, संभाषण, संवाद कौशल्यांच्या स्वरूपातील भाषेचे उपयोजन प्रभावी करता आले तर रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊ शकतात असे प्रतिपादन केले. यावेळी उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, विद्यार्थी विकास मंडळ प्रमुख प्रा संदीप थोरात, डॉ. राजेंद्र शिरसी, प्रा. किशोर लांडेपाटील, प्रा. गणेश धुमाळ डॉ. बाळासाहेब अनुसे, डॉ. विकास रासकर, डॉ. प्रभाकर जगताप, प्रा. गणेश मोढवे उपस्थित होते.

डॉ. शिरीष पिंगळे पुढे म्हणाले की, विद्यार्थी कोणत्याही शाखेचा असला तरी त्याने भाषिक आविष्काराच्या विविध रूपांची ओळख करून घ्यायला हवी. विद्यार्थ्यांना आपल्या भाषेत उत्तम पद्धतीने संवाद साधता येणे, सर्जनशीलतेने लिहिता येणे, स्वतःचे विचार प्रकट करता येणे ही काळाची नितांत गरज बनली आहे. त्यासाठी विद्यार्थ्यांनी विविध भाषिक कौशल्ये आत्मसात करण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावे, असे आवाहन त्यांनी केले.

या दोन दिवसीय कार्यशाळेत डॉ संजय शिंदे यांनीमुद्रितशोधनाचे महत्त्व, डॉ. बाळासाहेब अनुसे यांनी शुद्धलेखनाचे नियम, प्रा. प्रतीक्षा खराडे यांनीप्रमाणभाषा लेखन या विषयावर विद्यार्थ्यांशी संवाद साधला. या कार्यशाळेत सुमारे ७५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

प्रास्ताविक डॉ. संजय शिंदे यांनी तर आभार डॉ बाळासाहेब अनुसे यांनी मानले

**शुभेच्छा कार्यक्रम**

तृतीय वर्ष मराठी विषयाचे विशेषस्तरावर अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शुभेच्छा कार्यक्रमाचे आयोजन दि. ३ जून २०२२ रोजी करण्यात आले. या प्रसंगी बोलताना प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे यांनीपदवीचे शिक्षण घेताना विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या ज्ञानाचा उपयोग आपापले जीवन सर्वांगीणदृष्ट्या समृद्ध करण्यासाठी करावा असे आवाहन केले. या प्रसंगी उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, डॉ. बाळासाहेब अनुसे, प्रबंधक कैलास पाचारणे, प्रा. प्रतीक्षा खराडे उपस्थित होते. डॉ. शिरीष पिंगळे पुढे बोलताना म्हणाले, की संधी नेहमी कर्तृत्ववान लोकांना मिळत असते. विद्यार्थ्यांनी प्रामाणिकपणे, जिद्दीने शिक्षण घेऊन आपल कर्तृत्व सिध्द करावे. महाविद्यालयात गुणवत्ताधारित व कौशल्यनिपूण विद्यार्थी घडविण्याचा प्रयत्न करणार असल्याचे सांगून त्यांनी मराठी विषयाच्या विद्यार्थ्यांना भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

मराठी विभाग प्रमुख डॉ. संजय शिंदे यांनी मराठी विभाग राबवित असलेल्या शैक्षणिक उपक्रमांची माहिती सांगून विद्यार्थ्यांना भविष्यातील संधीबद्दल माहिती दिली. कृष्णा भिलारे, साक्षी गोसावी, काजल पडवळ, साक्षी शिवलकर, रोहिणी गारगोटे, अलिशा रौंधळ, प्रशांत सोनवणे यांनी याकार्यक्रमाचे नियोजन केले. प्रास्ताविक साक्षी गोसावी हिने, सूत्रसंचालन अलिशा रौंधळ हिने तर आभार कृष्णा भिलोरे याने मानले

याशिवाय मराठी विभागातील सर्व विषयांच्या (UG & PG) Notes वेबसाईट आणि गुगलक्लासवर अपलोड केल्या आहेत.

मराठी विभागप्रमुख **डॉ. संजय शिंदे** यांचे **'माझा गाव, माझी माणस'** या व्यक्तिचित्रणात्मक पुस्तकाचे प्रकाशन ७ मार्च २०२२ रोजी झाले. मराठी पदव्युत्तर विभागातील माजी विद्यार्थिनी **मयुरी हनुमंत भवारीह्या नेट परीक्षा उत्तीर्ण (फेब्रु. २०२२) झाल्या.** त्यांचे मराठी विभागाच्या वतीने हार्दिक अभिनंदन...!

डॉ. संजय शिंदे
मराठी विभाग प्रमुख
हुतात्मा राजगुरु महाविद्यालय
राजगुरुनगर,ता.खेड,जि.पुणे,